बी.ए.प्रथम वर्ष

सत्र दुसरे

# ‘अश्रूंची झाली फुले ’

प्रा.वसंत कानेटकर

प्रा.वसंत कानेटकर यांनी ‘अश्रूंची झाली फुले’ हे नाटक त्यांच्याच ‘निळे फुल’ या कथेवरुन लिहिले आहे. या नाटकाचे पात्रे प्रसंगाच्या चित्रणाशी संबंध नाही हे जरी खरी असले तरी या नाटकाच्या कथानकात वास्तवता आहे. या नाटकाला खूप यश मिळाले. या नाटकाची विविध वैशिष्टये आहेत.

**१) कथानकातील जिवंतपणा** : शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचारावर या नाटकाच्या कथानकाला सुरुवात होते. वास्तवतेचा आधार असल्यामुळे या नाटकाला एकप्रकारे जिवंतपणा आलेला आहे. प्रत्येक अंक वाचक–प्रेक्षकांना खिळवून ठेवते. या नाटकातील प्रत्येक पात्रांनी म्हणजे विद्यानंद, सुमित्रा, शंभुमहादेव, धर्माप्पा, श्याम, लाल्या यांनी आपल्या अभिनयातून, संच बोलण्यातून नाटकाला जिवंत केले आहे.

**२) उत्कट संवाद** : या नाटकातील संवाद ह्रदयाला भिडणारे आहेत. नाटकातील अर्धे यश हे नाटकातील संवादावर अवलंबून असते. प्रत्येकाच्या तोंडचे लहान संवाद देखील वाचक–प्रेक्षकांच्या मनाला भावणारे आहेत. विद्यानंद, लाल्या, धर्माप्पा, सुमित्रा यांच्या तोंडचे संवाद वाचकाला भारावून सोडणारे आहे. संवाद लिहिणाऱ्यावर नाटकाचे यश अवलंबून असते.

**संवाद** : ‘लग्न झालेल्या बाईला कोणी दुसऱ्याने वळण लावावे लागत नाही. संसाराचा पाशच तिला वळणावर ठेवतो’– सुमीत्रा.

“मुलांसारखा माझा एक विद्यार्थी जेलमध्ये गेला तर तुझं काय बिघडणार आहे हे तू एका शिक्षकाला विचारतोस ?” – विद्यानंद.

“अरे पोट बांधून सरस्वतीची सेवा करणाऱ्या माणसाच्या मागं लक्ष्मीनं उभं राहायचं नाही, तर मग काय किमत आहे आपल्या श्रीमंतीला आणि काय अर्थ उरला आमच्या अधिकाराला”– धर्माप्पा.

**३) भाषाशैली** : अश्रूंची झाली फुले हे वसंत कानेटकर लिखित नाटक अतिशय लोकप्रिय नाटक ठरले, याला कारण नाटकाचे कथानक व उत्तम भाषाशैली, संवाद, अभिनय कारणीभूत आहे, उत्तम भाषेतून नाटकाला वरच्या पट्टीत नेवून ठेवले, नाटकात प्रेमळपणा, क्रुरपणा, व्यावहारिकपणा, सूडभावना, मैत्रीची भावना, कर्तव्यदक्षता इत्यादी भाव भाषेद्वारेच आपल्याला कळते, आणि या उत्तम भाषाशैलीमुळे नाटकाला जिवंतपणा आलेला आहे.

**४) निवेदनपध्दती** : हे नाटक अतिशय आटोपशीर आहे. नाटकाचे कथानक वास्तव तर आहेच. पण कथानकातील जिवंतपणा वाचक प्रेक्षकांना शेवटपर्यंत उत्कंठावर्धक वाटणारा आहे. नाटकाची निवेदनशैली खुप पसरट झालेली नाही. अश्रूंची झाली फुले या नाटकात सत् आणि असत यांचा संघर्ष सतत तिन्ही अंकात वरच्या स्तरात पोहोचला दिसतो. सात्विक प्रवृत्तीचे विद्यानंद प्राचार्य असून गुन्हेगार होतात तर आवाराछाप लाल्या सी.आय.डी. इन्स्पेक्टर होतो. विद्यानंद लाल्याला सुधारण्याचा प्रयत्न करतो, तर लाल्या शेवटी त्यांना अटक करतो हा नाटकातील संघर्ष निवेदनशैलीमुळे वाचकाला प्रेक्षकाला खिळवून ठेवतो.

**५) काव्यमय शिर्षक** : ‘अश्रूंची झाली फुले’ महे नाटक शिर्षक अतिशय काव्यमय आहे. जेव्हा लाल्या सबइन्स्पेक्टरच्या कोर्ससाठी राजस्थानला जात असतो तेव्हा आशीर्वादासाठी तो विद्यानंदच्या घरी येतो. सुमित्रा व विद्यानंद त्याला शुभेच्छा देतात व पारिजातकाची फुले देतात.

शेवटी लाल्याला कळते की सोनेरी टोळीचा नायक हा दुसरा तिसरा कोणी नसून विद्यानंद आहे तेव्हा लाल्याला खुप पश्चाताप होतो व रडायला लागतो. या नाटकात विद्यानंद, कुटाप्पा, धर्माप्पा, श्यामच्या कारस्थानात जेलमध्ये जातात, तेव्हा अश्रू ढाळतात, आपल्या नवऱ्याची फसवणुक झाली म्हणून सुमित्रा अश्रू गाळते तर लाल्या विद्यानंदला अटक केल्यामुळे भावनावेगाने विद्यानंदाच्या हाताचे चुंबन घ्यायला लागतो, तेव्हा ते म्हणतात, “थांब वेडया, हे अश्रू पुसू नकोस, वाहू देत. आपल्या तिघांच्या अश्रूंची आज फुले झाली आहेत.

नवऱ्याची फसवणुक झाली. म्हणून सुमित्रा अश्रू गाळते. लाल्या विद्यानंदला अटक केल्यामुळे भावनावेगाने विद्यानंदाचे हाताचे चुंबन घ्यायला लागतो तेव्हा ते म्हणतात थांब वेडया, हे अश्रु पुसु नकोस वाहू देत , आपल्या तिघांच्या अश्रुंची आज फुले झाली आहेत.

**६) पात्रांची निवड** :–या नाटकात एकुण नऊ पात्रे आहेत. प्रा.विद्यानंद, सुमित्रा, धर्माप्पा, लाल्या, शंभुमहादेव, श्याम, प्रो.क्षिरसागर, प्रा.आरोळे या नाटकात काही पात्रे दुय्यम आहेत. इन्सपेक्टर, जेलर, तबीब, छब्बु, तर काही पात्रे अदृष्य आहेत. कुमार शंभुची पहिली बायको, लाल्याची बायको, कुटाप्पा सर्वच पात्रे आपआपल्या स्वभाव वैशिष्टयामुळे छाप पाडून जातात.

**७) नाटकाचा शेवट :**

या नाटकाचा शेवट अतिशय दमदार झालेला आहे. लाल्याविरुध्द विद्यानंद यांच्यातील संघर्ष पाहण्यासारखा आहे.लाल्या विद्यानंदाचे उपकार आठवून आक्रोश करतो. आणि इथेच नाटकाचा शेवट होतो. लेखकाने नेमक्या क्षणी नाटक संपविले आहे. यात लेखकाचे कौशल्य दिसून येते.

**८) वेगळ्या विषयावरील नाटक :**

वसंत कानेटकरलिखित 'अश्रूंची झाली फुले' या नाटकाला वास्तवतेचा आधार आहे. समाजातील संस्थाचालकाचा अरेरावीपणा, कॉलेजची भरमसाठ वाढ, शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचार, गुंडागर्दी, राजकारण सर्वांचा विचार कानेटकरांनी केला. एक वेगळ्या विषयावरील नाटक लिहून कानेटकरांनी समाजातील लोकांचे डोळे उघडले. कथानकातील जिवंतपणा वाचक–प्रेक्षकांची उत्कंठा वाढविते. तसेच नाटकाचा पहिला अंक अतिशय वेगवान आहे. एक नाटककार म्हणून वसंत कानेटकर सतत सजग राहतात. दुसऱ्या अंकात धर्माप्पाचे कटकारस्थान विद्यानंदाला अटक, लाल्याचे इन्स्पेक्टरच्या कोर्सला जाणे शेवटी विद्यानंदाला तुरुंगात दाखविले आहे. हा प्रवेश अतिशय उठावदार झाला आहे. तिसऱ्या अंकात नाटयमयता आहे. संघर्षाची परनावधी झाली आहे. वाचक–प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे नाटक आहे. यामुळे हे नाटक एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाते. नाटकाचा हा नवा विषय त्याच्या लोकप्रियतेला कारणीभूत आहे.

कादंबरी वाङ्मयः एक चिंतन

**कादंबरी :**

मनुष्याच्या जीवनाचे विविधागांनी केलेले चित्रण आणि त्याच्या चरित्राचा विविध परिस्थितीत दाखविलेला विकास या दोन गोष्टी कांदबरीशिवाय इतर साहित्य प्रकारात पहावयास मिळत नाही. त्यामुळे हा वाङ्मय प्रकार अतिशय लोकप्रिय झाला आहे.

कादंबरी तसे पाहता गद्य कथात्मक साहित्याचा एक प्रकार मानावा लागतो. इतर कथात्म साहित्यांपेक्षा कांदबरी वेगळी ठरते. विस्तार, जीवनातील वास्तवता, काळाचा व्याप, कपट, असंख्य व्यक्तिरेखा वर्णन, निवेदन, इत्यादी अभिव्यक्त साधनाच्या द्वारे प्रभावीपणे जीवनदर्शन कादंबरीत असते.

कादंबरीतील जीवनदर्शन कादंबरीकार घडवितो. तो प्रत्यक्षाच्या आधारावरच. पण कादंबरीतील जग हे संपूर्णपणे कल्पनेचे जग असते. म्हणून प्रत्यक्ष जीवनाचे प्रभावी तीव्र दर्शन घडून आणणाऱ्या चरित्र आत्मचरित्रापेक्षा कांदबरी वेगळी असते.

औद्योगिक क्रांतीनंतर जगभरात जिथे जिथे प्रतिष्ठित मध्यमवर्ग उदयास येऊन राजसत्ता नियंत्रित करु लागला. त्यानेच कादंबरीला जन्म दिला असे म्हणावे लागेल. कौटूंबिक जीवनातील समाजजीवनातील अनेक प्रकारची गुंतागुंत, तिचे स्वरुप, व्याप्ती यावर कादंबरीची भीड अवलंबून राहत असल्याचे दिसते. त्यामुळे कांदबरी ही कल्पनानिर्मित असली तरी त्यातून जीवनाचे वास्तवदर्शन घडून येते.

कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर वाढत बदलत जाणारा एक प्रवाही साहित्यप्रकार आहे. घटना, कथानक, पात्र भाषाशैली, निवेदन इत्यादी घटनांनी कादंबरीचा रुपबंध बनलेला आहे.

आपण ज्या जगात वावरतो, त्या जगाचे पुर्णत्व, वास्तवदर्शीपणा सांगणारा कादंबरी हा एक शोध असतो. आपल्याच समाजाच्या आत अनेक घटक असतात. त्यांच्या भावविश्वाचा शोध कादंबरीतून घेण्याचा प्रयत्न असतो. सामाजिक वास्तव्य या वैशिष्ट्यामुळे कादंबरी अनेककेंद्री बनते. कारण घटनांचा व काळाचा विशालपट घेऊन एक व्यक्ती वा अनेक कुटूंबे समाजात कशी व्यवहार करीत असतात. त्याचे तपशीलवार चित्रण कादंबरीकार करु लागतो. मानवी स्थिती प्रश्न विचारता विचारता तो एक सामाजिक अस्तित्व या दृष्टीकोनातून मानवी स्वभावावर, मानवी समूहाच्या वृत्ती–प्रवृत्तीवर प्रकाश टाकू लागतो.

बदलत्या कालप्रवाहात वास्तवाच्या कल्पना सरधोपट न राहता अधिक व्यामिश्र होवू लागल्या आहेत. हरी नारायण आपटे यांच्या कादंबरीतील वास्तव आणि भालचंद्र नेमाडे यांच्या ‘कोसला’ किंवा कमल देसाई यांच्या ‘काळा सूर्य’ कादंबरीतील वास्तव यांचे स्वरुप भिन्न आहेत.

सारांश कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर वाहत, वाढत बदलत जाणारा एक प्रवाही साहित्यप्रकार आहे. घटना कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली, भाषाशैली इत्यादी घटकांनी कादंबरीचा रुपबंध बनलेला आहे. त्यामुळे इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा कादंबरी वाङ्मयाचे स्वरुप वेगळे ठरते. त्यामुळे या वांडमय प्रकाराला अनन्य साधारण महत्व आहे.

## चरित्र

चरित्र म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा वृत्तांत असेही आपण म्हणतो, हा वृत्तांत अथ पासून इति पर्यंत असतो. इतिहास म्हणजे थोर पुरुषांचे चरित्र या विधानातच चरित्र आणि इतिहास यांच्यातील अनुबंध स्पष्ट होतो. तो असा की, इतिहासातच चरित्र असते. आणि चरित्रात इतिहास असतो. या दोघात व्यक्ती ही केन्द्रवर्ती असते. इतिहासात सत्यावर आधारित घटनांची कालक्रमानुसार नोंद असते. हया घटना व्यक्तीच्या अथवा समुहाच्या जीवनात घडलेल्या असतात. उदाहरणार्थ शिवाजीचा इतिहास (व्यक्तीजीवन) मराठयांचा इतिहास (व्यक्तींनी मिळून बनलेल्या जमातींचे जीवन).

इतिहासात सत्याला आणि विश्वसनीयतेला महत्व असते. सत्याचा आभास काल्पनिक सत्य इतिहासाला खपत नाही. चरित्र हा एखाद्या व्यक्तीने जीवनाचा इतिहास असतो.

हेरॉल्ड निकोल्सने दिलेल्या व्याख्येतील पूर्वार्धानुसार चरित्रांच्या व्याख्या – चरित्र म्हणजे ऐतिहासिक सत्याच्या आधारे घडवलेले एखाद्या व्यक्तीचे विश्वसनीय आणि अस्सल व्यक्तिदर्शन होय.

एखाद्या व्यक्तीचे अधिकृत चित्र विश्वसनीय चित्र वाचकांना सादर करणे हाच शुध्द अथवा निर्मळ चरित्राचा मुख्य उद्देश असतो. सर्वसाधारणपणे साहित्याच्या अनेकविध प्रयोजनात आत्मविष्कार हे एक प्रयोजन सांगितलेले

आहे. वस्तुतः चरित्र हे वस्तुनिष्ठ असते. चरित्रकाराला निवडीचे स्वातंत्र्य असते. चरित्रविषयाची निवड तो आपल्या आवडीनुसार करु शकतो. परंतु चरित्रनायकाविषयी आदर किंवा अनादर असेल तर त्याचा परिणाम चरित्रलेखनावर होतो. स्थूलमानाने चरित्र सर्वव्यापी साहित्यरुप आहे. बहुतेक सर्व कथात्मक चारित्र्यात चरित्र अंशरुपात असते. कथा, कादंबरी, नाटक इ.साहित्यरुपे कथानकप्रधान असतात, विविध घटकांच्या संरचनेतून एकसंघ असे व्यक्तीदर्शन घडते. मात्र ते सत्यपूर्ण नसते. त्यात सत्याचा आभास असतो. मात्र स्वतंत्र साहित्यरुप या दृष्टीने सत्यपूर्ण व्यक्तिदर्शन हेच चरित्राचे सत्य असते.

सातत्याने सत्याचे भान राखून एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनाचा कालानुसार, घटनानुसार व विषयानुरूप साधार विश्लेषणात्मक व परिचयात्मक इतिहास व त्या आधारे त्या त्या व्यक्तीमत्वाच्या विकासाचा आलेख सामान्यतः चरित्रग्रंथात रेखाटलेला आढळतो. इतिहास आणि साहित्य या दोन ज्ञानशाखांच्या सहाय्याने चरित्र हा वाङ्मय प्रकार विकसत असल्याने याकडे पाहण्याचा वाचकांचा दृष्टीकोन इतर वाङ्मयापेक्षा वेगळा असतो.

**चरित्र वाङ्मयाचे वर्गीकरण :**

**१. देवादिकांची व संताची चरित्रे** : श्रीराम, श्रीकृष्ण,भगवान परशुराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास यांची चरित्रे लिहिली गेली. तुकडोजी महाराज, शिवाजी महाराज या चरित्रनायकांच्या जीवनातील नाटयमय प्रसंगाचे, चमत्काराचे समर्थन या चरित्रात असते.

**२. राजकारण्यांची चरित्रे** : स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक राजकीय नेत्यांची चरित्रे आढळतात, लो.टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, म.गांधी, सरदार पटेल. स्वांतंत्र्योत्तर काळात विशेषतः पं.जवाहरलाल नेहरू, लालबहादुर शास्त्री इत्यादी.

**३. समाजकारण्यांची चरित्रे** : समाजसुधारक स्त्री शिक्षण विषयक सुधारक, शिक्षण तज्ञ, समाजचिंतक यांची चरित्रे लिहिली गेली.

**४. उद्योजकांची चरित्रे** :– महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर राज्यात सहकारी युगास आणि उद्योगधंद्याच्या विकासात प्रारंभ झाला. यामध्ये किर्लोस्कर, कल्याणी यासारख्या उद्योजकांची चरित्रे लिहिली गेली.

**५. क्रीडा व कलाक्षेत्र** – नाटय, चित्रपट, कलाशिल्प, संगीत क्षेत्रातील नामवंत कलावंताची चरित्रे येथे आढळतात. सारांश,चरित्रे हे कितीही वेळा लिहिली जाऊ शकतात. चरित्रात नायक हा लेखकाला जसा भासला तसा तो चित्रीत केलेला असतो. म्हणजेच एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा शोध म्हणजे चरित्र असे म्हणता येईल. चरित्र वांडमयाची सुरुवात मराठीत सुरुवातीला लीळाचरित्रासारखी गुरुचरित्र, संतचरित्रे लिहून झालेली दिसतात. चरित्रे म्हणजे गुणांचा पुतळा व बोधाचे खात्रीलायक ठिकाण, अशी समजूत दिसते. यामध्ये गुणगौरवाचे दर्शन घडतांना दिसते. कलात्मक यथार्थ व्यक्तीदर्शन म्हणजे चरित्र.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठीत लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांची संख्या व गुणवत्ता यांचा विचार करतांना संबंधित आत्मचरित्रकाराचा लेखनविषयक दृष्टीकोन आणि समाजाची व वाचकांची त्याकडे पाहण्याची वृत्ती लक्षात घ्यावी लागते. चरित्र वांडमयात सामान्यतः बाहेरून अंतर्मनात डोकावण्याची वृत्ती असते तर आत्मचरित्रात स्वत्वाकडून आत्मचरित्रकार समाजोन्मुख होण्याच्या प्रयत्नात असतो.

## आत्मचरित्र

आत्मचरित्र लेखकाच्या ते लिहिण्याच्या हेतू लक्षात घेता असे दिसते की, स्वतः विषयीच्या भावना–विचारांना वाट करुन देता देता संबंधीत विषयावरही नोंद टिपणे केली जातात. आत्मचरित्रात आपले आयुष्य अर्थपूर्ण आहे. हे स्वतःच्या जगण्याविषयीचे आपले वाटणे इतरापर्यंत पोहचविण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न असतो.

जेव्हा माणसाच्या अंतःकरणात दुःख दाटून येते तेव्हा त्याला कुठेतरी वाट दिल्याशिवाय राहवत नाही. आयुष्याच्या उतरणीच्या एखाद्या टप्प्यावरुन मागे वळून पाहतांना आजवरच्या अनेक सुखदुःख मिश्रित आठवणीची कळत नकळत होणारी उजळणी मनाला निश्चितच विरंगुळा देणारी असते. काही वेळा या लेखनातून स्वतःच्या शोधाबरोबरच स्वतः विषयांचे मत प्रतिपादनही बऱ्याचवेळा आढळते. सामान्यतः या निमित्ताने आत्मचित्रकार प्रगल्भतेने व थोडे अधिक गांभीर्याने स्वतःकडे पाहण्याच्या प्रयत्नात असतो.

अनेकदा आत्मचरित्रकार स्वतःच्या बालपणाविषयी कदाचित अलिप्तपणे लिहीतातही. पण मोठेपण, विशेषतः लेखनाच्या निकटचा भूतकाळ रंगवितांना ही अलिप्तता राखणे साधत नाही तर ते जड जाते. एकविसाव्या शतकात मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराला स्वतंत्र व महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. बहुरंगी मानवी जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा माणसाला असते. हे जिज्ञासापूर्तीचे समाधान आत्मचरित्राकडून मिळू शकते. आत्मचरित्र वाचकाच्या अंतःकरणाला भिडत असल्याने एक प्रकारचा जिव्हाळा या वाङ्मयप्रकारात जाणवतो. त्यामुळे आत्मचरित्राला एकप्रकारचा जिवंतपणा येतो.

आत्मचरित्राच्या साहित्यरुपात घटना–प्रसंगाच्या अनुक्रमामुळे अथवा कालानुक्रमामुळे एक प्रकारचा सलगपणा प्रत्ययाल येतो. समग्र व्यक्तिजीवनाचा सुसंगत आलेख उभा केलेला असतो. कुटूंब समाज आणि काळ यांच्या संदर्भातून हा आलेख ठळक होत जातो. म्हणून आत्मचरित्राला सुयोग्य आत्मचरित्र म्हटले जाते.